35 151

पोलीस व कारागृह कोठडीतील आरोपी अथवा गुन्हेगार यांच्या मृत्यू प्रकरणी मृत व्यक्तीचे शवविच्छेदन करताना व्हिडीओ फिल्म घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन निर्णय क्रमांक एचआरसी ०१९५/३४/पोल-१४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १८ जानेवारी, १९९९.

वाचा:- मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अध्यक्ष, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांनी पाठविलेले क्र. २/६/सीएच/एनएच/आरसी-९५, दिनांक १० ऑगस्ट, १९९५ चे पत्र.

शासन निर्णय:- पोलीस व कारागृह कोठडीतील संशयित आरोपी व गुन्हेगार यांच्या मृत्यू प्रकरणी मृत व्यक्तींचे शवविच्छेदन करताना व्हिडीओ फिल्म घेण्याबाबतची कार्यवाही ज्याप्रमाणे भारतातील अन्य राज्यात अवलंबिली जात आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात ही पध्दत सुरु करण्याबाबत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने राज्य शासनास कळविले आहे.

पोलीस / कारागृह कोठडीतील मृत्यू प्रकरणी करावयाच्या चौकशी बाबतच्या कार्यवाहीत पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने केलेली शिफारस मान्य करुन राज्यात पोलीस कोठडीतील मृत व कारागृह कोठडीत झालेल्या अनैसर्गिक मृत व्यक्तीचे शवविच्छेदन करताना व्हिडीओ फिल्म घेण्यास शासन मान्यता देत आहे. पोलीस / कारागृह कोठडीत मृत पावणाऱ्या व्यक्तीचे शवविच्छेदन करताना व्हिडीओ फिल्म घेण्याची ज़बाबदारी मुंबई शहरात अपमृत्यू निर्णेता, मुंबई आणि जिल्हा व तालुका पातळीवर सिव्हील सर्जनची राहिल.

यासंबंधात मुंबई पोलीस मॅन्युअल खंड-३, नियम १४३ मध्ये योग्य ती सुधारणा करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. व सध्याच्या तरतुदीप्रमाणे व्हिडीओ फिल्म घेताना तेथे कोणीही पोलीस अधिकारी / कर्मचारी उपस्थित राहू नये.

ॲटोप्सी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ही चित्रफीत प्रमाणित करुन सीलबंद करावी व त्याची एक प्रत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे पाठवावी.

याबाबत येणारा खर्च मुंबई येथे संबंधित अपमृत्यू निर्णेता व जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी सिव्हील सर्जनने प्रथम करावा व त्या खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक / कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून करण्यात यावी.

या प्रकरणी येणारा खर्च मुंबई करीता "२०१४-न्यायदान-१०९ अपमृत्यू निर्णेता-०५-कार्यालयीन खर्च" व "२०५६-तुरुंग-००१-संचालन व प्रशासन-००१ [एक] कारागृह

निरीक्षणालय-०५- कार्यालयीन खर्च" आणि मुंबई व्यतिरिक्तच्या ठिकाणासाठी "२०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस १०९[एक][१] जिल्हा पोलीस दल-०५-कार्यालयीन खर्च" तसेच २०५६-तुरुंग-००१-संचालन व प्रशासन ००१[एक] कारागृह निरीक्षणालय-०५ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त /कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील वरील लेखाशिर्षाखाली पुस्तकी समायोजनेव्दारे प्रतिपूर्ती करण्यात यावी.

हा शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर क्र. ८८०/९८-व्यय-७, दि. १७ ऑक्टोबर, १९९८ व क्र. २२२/अर्थसंकल्प-१०, दिनांक १७ ऑक्टोबर, १९९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ के. एस. सय्यद ]

सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

~~कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,~~

सचिव [कारागृह], गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,

सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,

सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

सर्व पोलीस आयुक्त,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे

कॉरोनर, मुंबई, जे. जे. रुग्णालय कम्पाऊंड, मुंबई.

कार्यासन अधिकारी [पोल-४], गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,

कार्यासन अधिकारी [तुरुंग-१], गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.